**स्थायी समिती**
**दाखल विषय – दि. १५/५/२०१७**

**विषय क्रमांक :– ११८ त्वर्य**
मा.प्रमोद (नाना) भानगिरे यांचे दि. १५/५/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. २६ ब महंमदवाडी सर्व्हे नं. १३ मधील ओपन स्पेसमधील जागेवर वारकरी भवन बांधण्यात यावे.

**विषय क्रमांक :– ११९ त्वर्य**
मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे व मा.सौ.शितल सावंत यांचे दि. १५/५/२०१७ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या स.नं.९४/१अ/१ येरवडा पुणे ६ येथे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये वाल्मिकी वसाहत ही मागासवर्गीय नागरिकांची ३० ते ४० कुटुंब असलेली वसाहत गेल्या ५० वर्षापासून वास्तव्यास आहे.या वसाहतीमध्ये पुणे महानगरपालिकेने सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत उदा.पाण्याचे कनेक्शन,ड्रेनेज व्यवस्था,सुलभ शौचालय इत्यादी तसेच याठिकाणी महानगरपालिकेच्या वतीने वाल्मिकी समाजाचे समाज मंदिर देखिल बांधण्यात आलेले आहे.

राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने पुण्यामध्ये मध्यवर्ती असलेल्या ससून रुग्णालयाच्या शेजारी एम.एस.आर.टी.सी.ची जागा पुण्यामध्ये अद्ययावत कॅन्सर हॉस्पिटल बांधणे करिता प्रस्तावित केली आहे व त्या बदल्यामध्ये एम.एस.आर.टी.सी. ला वाल्मिकी वसाहत येथील आरोग्याच्या अधिपत्याखाली असलेली जागा महाराष्ट्र माणसिक आरोग्य संस्था यांचेकडून घेण्याचा प्रस्ताव आहे व त्याकरिता या वसाहतीमधील सर्व रहिवाशांना स्थलांरीत होण्याच्या नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.

आमची आपणास विनंती आहे पुणे शहरामध्ये कोणताही विकासाचा प्रकल्प होत असताना त्याला विरोध न करता तेथील नागरिकांचे विस्थापन न करता योग्य ते पूनर्वसन करणे राज्य सरकारचे धोरण आहे.

तरी आपणास विनंती आहे बी.एस.यु.पी.अंतर्गत आहे त्याच ठिकाणी या वसाहती मधील नागरिकांचे पुनर्वसन करण्यात यावे.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**